# वृत्त प्रसिद्धी करीता

## विद्यार्थ्यांकरीता सुवर्णसंधी

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे मार्फत **'माहितीचा अधिकार अधिनियम 2005'** या कायद्याचे प्रशिक्षण देणारा **दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम** चालविला जातो. कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार पुरस्कृत सेंट्रल प्लॅन स्कीम 2016-17 च्या निधीमधून डिसेंबर, 2016 ते फेब्रुवारी, 2017 या कालावधीत दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या 2 तुकड्या **विद्यार्थ्यांकरीता (जागा 50)** व **विद्यार्थीनीकरीता (जागा 50) विनामूल्य** आयोजित करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाकरीता स्वखर्चाने यशदामध्ये यावे लागेल, त्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व इतर भत्ते देय असणार नाही.

अभ्यासक्रमाचा कालावधी 3 महिन्यांचा असून 3 संपर्क सत्रे फक्त रविवारी [दिनांक 4.12.2016, 15.01.2017 आणि 19.02.2017] मराठी माध्यमामध्ये आयोजित केली जातील. अभ्यासक्रमाची नाव नोंदणी यशदा संकेतस्थळावर आणि यशदामधील माहिती अधिकार केंद्रामध्ये चालू आहे. इयत्ता 8 वी ते पदव्युत्तर पदवी या वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येईल. माहिती अधिकार या विषयात आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा. प्रथम येणाऱ्यास किंवा अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राध्यान्य याप्रमाणे प्रवेश दिला जाईल. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी पूर्ण माहिती भरलेला अर्ज, एक रंगीत छायाचित्र व शाळा किंवा महाविद्यालयाच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रवेशाकरीता आवश्यक राहिल. नावनोंदणी करावयाचा अर्ज व अभ्यासक्रमाचा तपशील यशदाच्या संकेतस्थळावर किंवा माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे येथे उपलब्ध आहे.

संकेतस्थळ : www.yashada.org (RTI Website मध्ये पहावे)

अधिक माहितीसाठी संपर्क : कार्यक्रम समन्वयक,
माहिती अधिकार केंद्र,
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)
राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे-411007
दूरध्वनी : 020-25608216 (कार्यालयीन वेळ 9.30 ते 5.15)